युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
गुरुवार दि.२२ जानेवारी २०२६

## ग्रामीण रुग्णालय अडयाळ येथे राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अड्याळ :** दि.२० जानेवारी २०२६ ला ग्रामीण रुग्णालय अडयाळ येथे राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा रुग्णालय भंडारा च्या वतीने भव्य ताण तणाव मुक्त, मानसिक आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयाजन करण्यात आले.

ज्यामध्ये मानसिक आजार, डोकेदुखी, ताण तणाव, उदासपणा, चिंता रोग, बैचेनी, घबराहट, मिर्गी, सेक्स समस्या, व्यसन समस्या, लकवा, मेंदूचे आजार, तसेच हृदय रोग मधुमेह बीपी याची तपासणी तज्ञ मंडळींकडून करण्यात आली. तसेच या शिबिरात आहार, योग विषयक तज्ञ मंडळींकडून सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटक (अध्यक्ष) म्हणून सोहेल खान ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. मुनेश्वर बोदलकर तंटामुक्ती अध्यक्ष, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बनसोड (M.O.), डॉ.मनीष बत्रा (डेंटिस्ट), डॉ.निखिल बांगडकर, डॉ.अंकिता शहरे, श्रीमंती चकोले (आहार तज्ञ), श्रीमती ठोंबरे (योगा तज्ञ), डॉ. बांडेबुचे (मानसोपचारतज्ञ), यांनी विविध मानसिक आजारा संदर्भात गावातील लोकांना व रुग्णांना मार्गदर्शन केले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# बाहेरील रेती माफियांना मोकळे रान, स्थानिकांवर मात्र कारवाईचा बडगा!

## परजिल्ह्यातील ट्रक 'सेफ पॅसेज' ने बाहेर

## नियम फक्त स्थानिकांसाठीच का?




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्ह्यात रेती वाहतुकीचा प्रश्न आता केवळ अवैध उत्खननापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर थेट प्रश्नचिन्ह उभे करणारा बनला आहे. जिल्ह्यात आजतागायत एकाही रेतीघाटाचा अधिकृत लिलाव न झालेला असताना देखील, भंडारा जिल्ह्यासह गोंदिया जिल्ह्यातील नदीपात्रातून शेकडो ट्रकद्वारे रेती उपसा व वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे, ही वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, हा प्रश्न आता उघडपणे विचारला जाऊ लागला आहे.

**कारवाई फक्त 'सोपी टार्गेट्स' वरच?**

महसूल व पोलिस विभागाकडून अधूनमधून कारवाई केल्याचे दाखवले जात असले तरी, प्रत्यक्ष वास्तव धक्कादायक आहे. आतापर्यंत ज्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे, त्यामध्ये बहुसंख्य वाहने ही भंडारा जिल्ह्यातील स्थानिक व्यावसायिकांची असल्याचे स्पष्ट दिसून येते. नियमांची अंमलबजावणी करताना प्रशासनाने 'लो-रिस्क, लो-पॉवर' लोकांनाच लक्ष्य केले, असा आरोप आता उघडपणे केला जात आहे.

**स्थानिक रेती व्यवसायिकांची कोंडी**

या दुटप्पी धोरणामुळे स्थानिक रेती व्यवसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. एकीकडे दंड, जप्ती, गुन्हे दाखल करण्याची भीती, तर दुसरीकडे बाहेरच्यांना खुले संरक्षण – या अन्यायकारक धोरणामुळे 'आम्ही जिल्ह्याचे नागरिक असूनही गुन्हेगार ठरत आहोत' अशी भावना व्यावसायिकांमध्ये निर्माण झाली आहे.

प्रशासनाने तात्काळ निष्पक्ष कारवाई न केल्यास, स्थानिक रेती व्यवसायिक व नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. 'एकतर सर्वांवर कारवाई करा, नाहीतर कुणावरही नाही' अशी ठाम भूमिका आता घेतली जात आहे.

रेती ही नैसर्गिक संपत्ती आहे, कुणाची खाजगी मालमत्ता नाही. जर प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करून पारदर्शक आणि समान न्याय दिला नाही, तर भंडारा जिल्ह्यातील हा रेती प्रश्न भविष्यात मोठ्या जनआंदोलनाचे रूप घेतल्याशिवाय राहणार नाही.

**परजिल्ह्यातील माफियांसाठी 'नो-चेक, नो-ऑब्जेक्शन' धोरण?**

एकीकडे स्थानीक वाहनांवर मोठया प्रमाणात कारवाई होत असतांना दुसरीकडे, परजिल्ह्यातून येणाऱ्या रेती माफियांचे ट्रक हे भंडारा जिल्ह्यातील रस्त्यावरून बिनदिक्कत रेती भरून, भरधाव वेगाने वाहतूक करताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी तपासणी नाके, चेकपोस्ट व अधिकारी उपलब्ध असतानाही या वाहनांना अडवले जात नाही. उलट, कोणतीही अडचण न आणता जिल्ह्याच्या सीमेबाहेर 'सुरक्षित सोडचिठ्ठी' दिली जाते, हे चित्र वारंवार समोर येत आहे. यामुळे 'कारवाई नावापुरती, संरक्षण भरपूर' अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. हा सगळा प्रकार पाहता, प्रशासन आणि रेती माफियांचे साटेलोटे असल्याशिवाय हे शक्य नाही, असा संशय आता बळावत चालला आहे.

**परजिल्ह्यातील रेती माफियांसाठी 'रेड कार्पेट'?**

धक्कादायक बाब म्हणजे, परजिल्ह्यातून आलेल्या रेती माफियांचे ट्रक हे भंडारा जिल्ह्यातील नदीपात्रातून बिनदिक्कत भरधाव वेगाने वाहतूक करत असतानाही त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. अनेक ठिकाणी महसूल, पोलिस व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित असतानाही या वाहनांना अडवले जात नाही, उलट सुरक्षितपणे जिल्ह्याच्या सीमेबाहेर सोडले जाते, असा आरोप उघडपणे होत आहे.या प्रकारामुळे 'स्थानिकांवर दंडुका, बाहेरच्यांना संरक्षण' असा स्पष्ट दुटप्पीपणा प्रशासनाकडून सुरू असल्याची भावना बळावत आहे. यामुळे प्रशासन आणि रेती माफियांचे साटेलोटे तर नाही ना, असा थेट सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे.

# दुचाकीची उभ्या ट्रकला धडक; युवक ठार




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर अपघाताचे सत्र थांबण्याचे नावच घेत नाही. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला दुचाकी चालकाने मागील बाजुने जोरदार धडक दिली. त्यात ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. संकेत सपाटे असे मृत तरुणाचे नाव आहे. हा अपघात आज सकाळी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संकेत सपाटे हा पहाटेच्या सुमारास त्याच्या दुचाकीने भंडारा येथून लाखनीकडे जात होता. धारगाव जवळ पोहचला असता मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला त्याच्या स्कूटीने मागून जोरदार धडक दिली. या धडकेत संकेत स्कुटीवरून खाली कोसळला. ही धडक इतकी जोरदार होती की संकेतच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संकेतला वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

या प्रकरणी पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला असून पुढील तपास सुरु केला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, महामार्गावर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्पाच्या सुरक्षा रक्षकांना १२ तासाचे २०० रुपये

## उपासमारीची पाळी

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सिहोरा :** शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या महत्वाकांक्षी सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्पात तैनात आलेल्या सुरक्षा रक्षकावर अन्याय होत असल्याचे वृत्त नुकतेच पुढे आले आहे. एका सुरक्षा रक्षकाला महिन्याकाठी ६ हजार रुपये मानधन दिल्या जात आहे. १२ तास सेवा दिल्यानंतरही फक्त २०० रुपये दर दिवसाला दिले जात आहे. मानधनात वाढ करण्याची मागणी सुरक्षा रक्षक करीत आहेत. परंतु निविदा कंत्राटदार याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आल्याचे सांगितले जात आहे.

सातपुडा पर्वताच्या सानिध्यात व घनदाट जंगलात असणाऱ्या महत्वाकांक्षी सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्पात सुरक्षा रक्षकांची नियुक्ती निविदा कंत्राटदाराने केली आहे. सुरक्षा रक्षकांच्या कर्तव्यासाठी दोन सिप्ट तयार करण्यात आलेल्या आहेत. सकाळ ते सायंकाळ आणि सायंकाळ ते सकाळ असे दोनच सिप्ट आहेत. यात ३ सुरक्षा रक्षक कर्तव्य बजावत आहेत. सकाळ पाळीत १ व रात्र पाळीत २ सुरक्षा रक्षक कर्तव्य बजावत आहेत. सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करताना कोणतीही अट नाही. मग तो महाराष्ट्राचा असो किंवा मध्यप्रदेशातील नागरीक त्याची सुरक्षा रक्षक पदावर नियुक्त केली जात आहे.

या सुरक्षा रक्षकांना महिन्याचे ६ हजार रुपये मानधन दिले जात आहे. १२ तास जंगलात जीवाची पर्वा न करता जीव मुठीत धरून आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यांना प्रत्येकी २०० रुपये हे तुटपुंजे दर दिले जात आहे. हे दर अल्प असल्याने अनेक वेळा मानधनात वाढ करण्याची मागणी केली परंतु निविदा कंत्राटदार दुर्लक्ष करीत असल्याचे सांगितले जात आहे. सुरक्षा रक्षकांना कोणत्याही सेवा आणि सुविधा उपलब्ध नाहीत. सुरक्षा रक्षकांची हजेरी बुक नाही. दिवाळीत बोनस सुद्धा दिले जात नाहीत. ११० कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या प्रकल्पाच्या सुरक्षा रक्षकांना वाऱ्यावर सोडण्यात आल्याचे विदारक चित्र सध्या दिसून येत आहे.



सोंड्या टोला उपसा सिंचन प्रकल्पात ३ सिप्ट करण्याची आवश्यकता असतांना २ सिप्टवर काम भागविले जात आहे. ६ सुरक्षा रक्षकाची गरज असताना फक्त ३ सुरक्षा रक्षक नियुक्त आहेत. प्रकल्पात एका सिप्टमध्ये २ सुरक्षा रक्षक नियुक्तीचे नियोजन आहे. निविदा कंत्राटदार नियुक्तीला हरताळ फासत असल्याचे दिसून येत आहे. सकाळ पाळीत एका सुरक्षा रक्षकांची जागा रिक्त असतांना भरली जात नाही. प्रकल्प परिसरात वाघ, बिबट्या हे वन्य प्राणी फेरफटका मारत आहेत.यापूर्वी प्रकल्पात साहित्य चोरीचे प्रकरण झालेले आहेत. याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने सुरक्षा रक्षकांच्या मनात असंतोष खदखदत आहे. तुटपुंज्या मानधनावर आपले कर्तव्य चोख बजावत असतांनाही मागील दोन महिन्यापासूनचे मानधन थकल्यामुळे उदरनिर्वहाचा प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे.

# 'चालान' च्या नावाखाली वाहतुक पोलीसांची अवैध वसुली?

## नागरिकांचा आरोप, पोलीस अधीक्षकांनी लक्ष देण्याची मागणी

**हर्षल खडसे/युवाराष्ट्र दर्शन**

**तुमसर २२ जानेवारी :** वाहतुक पोलीसांकडुन 'चालान' च्या नावाखाली वाहनचालकांना नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप वाहन धारकांकडुन केला जात आहे.वाहनचालकांना कायद्याचा धाक दाखवुन सेटलमेंटच्या नावाखाली मोठी आर्थिक लुटमार सुरू असल्याचा आरोपही नागरीकांकडुन केला जात आहे. वाहतुक पोलीसांच्या या भूमिकेमुळे नागरीकांमध्ये पोलीस विभागा विषयी रोष व्यक्त केला जात असुन जिल्हा पोलीस अधिक्षकांनी याकडे लक्ष देण्याची मागणी नागरकांकडुन केली जात आहे.

वाहतुकीला शिस्त लागावी व रस्त्यावरील अपघात टाळले जावे याकरीता वाहतुक पोलीसांची नेमणुक करण्यात येत असते हे करीत असतांना वाहतूक पोलिसांना वाहतूकदारांवर दंड बजावण्यासाठी काही नियम बंधनकारक केले आहे.मात्र तुमसर वाहतुक पोलीसांच्या 'हम करे सो कायदा' या धोरणाचा नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील वाहतूक पोलीस दुचाकी वाहतूककर्त्यांना नियमा बाहेर जाऊन धाक दाखवून दुचाकी वाहतूक कर्त्यांचे खिसे कापले जात असल्याचे शहरातील दुचाकी वाहतूक कर्त्यांमध्ये बोलले जात आहे.

**जाब विचारल्यावर दमकाठी,मर्जी सारखे चालान!**

वाहनांवर चालान आकारणाऱ्या वाहतूक पोलिसांना चालान बद्दल किंवा मोबाईल द्वारे फोटो काढत असतांना जाब विचारले असता सरळ दुचाकी वाहतूककर्त्यांना दमकाठी दाखवत मनमर्जी चालान बजावत असल्याचे दुचाकी वाहतूक कर्त्यांमध्ये बोलले जात आहे.

# पवनी-उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात ४ वाघांचे दर्शन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील पवनी-उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात चार वाघांचे मनमोहक दृश्य पर्यटकांच्या नजरेस पडले असून ते सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. जंगल सफारीसाठी गेलेल्या काही पर्यटकांना एकाच वेळी चार वाघांचे दर्शन झाले.या दुर्मिळ क्षणाचे त्यांनी मोबाईलमध्ये चित्रीकरण केले असून हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. वाघांचे मुक्त संचार करतानाचे दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांमध्ये उत्सुकता वाढली असून अभयारण्यात पर्यटकांची गर्दी वाढताना दिसत आहे.

# साकोलीत रस्ता सुरक्षा अभियानाचा धडा; ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचे प्रबोधन!

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** वाढत्या रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि तरुणांमध्ये वाहतूक नियमांची जनजागृती करण्यासाठी आज साकोली येथे 'रस्ता सुरक्षा-जीवन रक्षा' या मोहिमेतंर्गत भव्य प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, माननीय उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. साकोली येथील बाजीराव करंजेकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि कॉलेज ऑफ फार्मसी या दोन ठिकाणी हे सत्र पार पडले. दोन्ही सत्रांमध्ये मिळून अंदाजे ६०० (प्रत्येकी ३००) विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेच्या विविध पैलूंवर तांत्रिक आणि व्यावहारिक माहिती देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने: मद्यप्राशन करून वाहन चालवण्याचे दुष्परिणाम. ओव्हर स्पीडिंग आणि रॅश ड्रायव्हिंग टाळणे. 'राहवीर' (Good Samaritan) योजना: अपघाताच्या वेळी मदत करणाऱ्यांना मिळणारे कायदेशीर संरक्षण. वाहतूक नियमांचे पालन आणि शिस्त.कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक श्री. शेखर आचार्य (मो.वा.नि. भंडारा) यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत नियमांचे महत्त्व पटवून दिले. "रस्त्यावरील सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून ती स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनाची जबाबदारी आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

# मॉयल प्रशासनाच्या निर्णयामुळे शेकडो कुटुंबांचे उद्ध्वस्त होत असलेले जीवन वाचवा

◆ प्रकाशकुमार धिकोडी यांचे जिल्हाधिकाऱ्यांना थेट निवेदन ◆ अनुकंपा रोजगार योजनेतील अन्यायाविरोधात उपोषण करणार

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**नाकाडोंगरी :** माईल लिमिटेडकडून अनुकंपा रोजगार योजनेत करण्यात आलेल्या नव्या बदलांमुळे मृत कर्मचाऱ्यांचे आश्रित, मेडिकल अनफिट कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप करीत युवक उपजिल्हाप्रमुख भाजपा भंडारा तथा सीतासावंगी सरपंच प्रकाशकुमार धिकोडी यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. या निर्णयामुळे शेकडो कुटुंबांचे जीवन उद्ध्वस्त होत असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माईल प्रशासनाने १ जानेवारी २०२६ पासून अनुकंपा रोजगार योजनेत केलेला बदल अमानवीय, अन्यायकारक व सामाजिक न्यायाच्या मूलतत्त्वांच्या विरोधात आहे. सेवाकाळात कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास अनुकंपा नियुक्ती नाकारणे चुकीचे असून सामान्य मृत्यू व अपघाती मृत्यू यामध्ये भेद करणे पूर्णतः अन्यायकारक आहे. याच मुद्द्यावर सरपंच प्रकाशकुमार धिकोडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देत प्रशासनाचे लक्ष वेधले. जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणात माईल प्रशासनाकडून स्पष्टीकरण मागून पीडित कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

**३० दिवसांत निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

या निवेदनाची दखल घेऊन ३० दिवसांत न्याय न दिल्यास, हजारो कर्मचारी, मेडिकल अनफिट पीडित व त्यांच्या कुटुंबीयांसह १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता माईल कार्यालय, सीतासावंगी समोर आमरण उपोषण व तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा कडक इशारा युवक उपजिल्हाप्रमुख भाजपा भंडारा तथा सीतासावंगी सरपंच प्रकाशकुमार धिकोडी यांनी दिला आहे.

सेवेदरम्यान गंभीर आजार, अपघात अथवा अन्य कारणांमुळे मेडिकल अनफिट घोषित करण्यात आलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्षे न्याय मिळत नसल्याचेही निवेदनात नमूद आहे. काही कर्मचारी पूर्णतः अपंग असून त्यांच्या कुटुंबांची उपजीविका अत्यंत बिकट अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सेवावृत्तीस अवघी ३ ते ५ वर्षे शिल्लक असतानाही मेडिकल अनफिट कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने काम करून घेतले जात असल्याचे प्रकार उघडकीस आले असून हे श्रमकायदे व मानवी हक्कांचे सरळ उल्लंघन असल्याचे सांगण्यात आले आहे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सेटलमेंट किंवा अनुकंपा लाभ देताना लावलेली ६ लाख वार्षिक उत्पन्नाची अट ही गरिबग्रस्त कुटुंबांसाठी अन्यायकारक असून ती तात्काळ रद्द करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

मार्तंडराव कापगते स्मृती प्रतिष्ठान साकोली
स्मृती सोहळा
उद्घाटन तथा पुरस्कार सोहळा
गुरूवार दि. २२ जानेवारी २०२६ सकाळी ११ वाजता
स्थळ : रामाजी कापगते विद्यालय तथा कनिष्ठ महा. बोदरा
तह. साकोली, जिल्हा भंडारा
अध्यक्ष • सौ. देवश्री मनिष कापगते, नगराध्यक्षा नगरपरिषद साकोली
उद्घाटक • इंजि. राजकुमार बडोले, माजी सामाजिक न्यायमंत्री म. रा. मुंबई तथा आमदार अर्जुनी/मोर. विधानसभा
अतिथी • श्री. अविनाशजी ब्राह्मणकर, सदस्य जिल्हा परिषद भंडारा
सौ. वनितातार्ई डोये, सदस्या जिल्हा परिषद भंडारा
श्री. डॉ. अविनाश काशिवार, सभापती - कृ. उ. बा. समिती अर्जुनी/सडक
सौ. ललिता विलास कापगते, सरपंचा ग्रामपंचायत बोदरा
उपरोक्त कार्यक्रमास आपण सादर आमंत्रित आहात
• विनीत •
होमराज मार्तंडराव कापगते
जांभळी/स. ( साकोली )
सहकार्य - ग्रामपंचायत कमेटी बोदरा ता. साकोली

